गृह विभाग

अर्थसंकल्प : २०२२-२३

महाराष्ट्र शासन

समर्थन

अर्थसंकल्प अध्ययन केंद्र

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती / हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर - ९८९२९३९६१७

विशेष सहाय्य :
निलम काकड, स्नेहा घरत, विलास सुवरे, राजश्री कदम व उमेश सांगळे

प्रसिद्धी:
मनोज सातवी

मांडणी व अक्षरजुळणी :
प्रतिक्षा कोयंडे

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏ ०२२-२२००३०६०
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१४-१५ पासून २०२०-२१ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२१-२२ सुधारित अंदाज तसेच २०२२-२३चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:
रुपेश कीर -९८९२९३९६१७

मार्गदर्शक-विवेक पंडित

संस्थापक, समर्थन

गृह विभाग

गृह विभाग अर्थसंकल्प सन २०२२-२३

ठळक वैशिष्ट्ये

<u>गृह विभाग अर्थसंकल्प</u>:

☞ सन २०२२-२३चा गृह विभागाचा अर्थसंकल्प रु.२४ हजार ५८७ कोटी ७ लाखांचा आहे.

☞ सन २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत गृह विभागावर सरासरी ५.४१% खर्च झाला आहे.

☞ सन२०२१-२२चे गृह विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. २१ हजार ४०५ कोटी ७४ लाखांचे होते ते सुधारित झाल्यानंतर त्यात घट झाली असून आता ते रु. १८ हजार ८९१ कोटी ४८ लाखांचे झाले आहेत. **<u>याचा अर्थ सन २०२१-२२च्या अर्थसंकल्पात रु. २ हजार ५१४ कोटी २६ लाखांची घट झाली आहे. त्याचे प्रमाण ११.७५% आहे</u>**.

☞ सन २०२०-२१ चा मूळ अर्थसंकल्प रु. २५ हजार २९६ कोटी ४९ लाखांचा होता, त्या तुलनेत रु. १५ हजार ४९४ कोटी १७ लाख खर्च झाले. **<u>याचाच अर्थ प्रत्यक्ष खर्चात रु. ९ हजार ८०२ कोटींची घट झाली. त्याचे प्रमाण ३८.७५% इतके मोठे आहे</u>**.

☞ सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी रु.१५ हजार ३६२ कोटी खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी रु.१२ हजार २५६ कोटी खर्च करण्यात आले. गृह विभागाच्या तुलनेत पोलीस खात्यावर झालेला खर्चाचे प्रमाण ७९.७८% आहे. म्हणजे उर्वरित खर्च म्हणजेच उर्वरित २०.२२ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.

☞ **<u>सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षाच्या कालावधीत गृह विभागावर सन २०१९-२० या कालावधीत सर्वात जास्त रक्कम रु. १९ हजार ९२१ कोटी खर्च झाले होते</u>**.

☞ **<u>सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षाच्या कालावधीत पोलीस खात्यावर सन २०१९-२० या कालावधीत सर्वात जास्त रु. १६ हजार १४७ कोटी खर्च झाले होते</u>**.

(स्त्रोत:अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, २०१७-१८ ते २०२२-२३, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)

पोलीस:

☞ महाराष्ट्राची वर्ष २०२१ची अंदाजीत लोकसंख्या १२ कोटी ४९ लाख इतकी असून माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यातील पोलीसांची संख्या २ लाख ११ हजार १८३ इतकी आहे. पोलिसांवरील ताण वाढत असून १ लाख लोकसंख्येमागे १६९ पोलीस उपलब्ध आहेत.

☞ महाराष्ट्रात महिला पोलीसांची संख्या २७ हजार १६७ इतकी असून एकूण पोलीस संख्याबळाच्या तुलनेत ही संख्या १२.८६% इतकी आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्याची आवश्यकता आहे.

☞ महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून २ लाख ११ हजार १८३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८३ हजार ६१८ पोलीसांना निवासस्थाने उपलब्ध झाली आहेत. तर आजही राज्यातील ७१ हजार ८२४ (३४.०१%) पोलीस निवास्थानापासून वंचित आहेत.

☞ मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई पोलीसांचे संख्याबळ ५० हजार ४१५ इतके असून त्यापैकी २२ हजार २२० पोलीसांना निवासस्थान उपलब्ध झाले आहे, तर आजही २८ हजार १९५ (५५.९३%) निवासस्थानांची कमतरता आहे.

☞ राज्याच्या अप्पर पोलीस महासंचालकांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार नागरी हक्क संरक्षण कक्षात पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार यांची ३९८ पदे मंजुर असून त्यापैकी ३८४ पदे भरली गेली असून १४ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमध्ये पोलीस अधीक्षकांची ४, पोलीस उप अधीक्षक ३, पोलीस निरीक्षक १ व पोलीस अंमलदारांची ६ पदे रिक्त आहेत.

(स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती)

भारतात व महाराष्ट्रात घडलेल्या गुन्ह्यांचे तुलनात्मक विश्लेषण:

- ☞ सन २०२० मध्ये भारतात ६६ लाख १ हजार २८५ गुन्हे नोंदवले गेले असून, नोंदविलेल्या एकूण गुन्ह्यांमध्ये १) तामिळनाडू (१३ लाख ७७ हजार ६८१), २) ६ लाख ९९ हजार ६१९, ३) उत्तर प्रदेश ६ लाख ५७ हजार ९२५, ४) केरळ (५ लाख ५४ हजार ७२४) तर महाराष्ट्र (५ लाख ३९ हजार ३) इतके गुन्हे दाखल झाले असून महाराष्ट्र ५व्या क्रमांकावर आहे.
- ☞ महाराष्ट्रात सन २०१९ मध्ये ५ लाख ९ हजार ४३३ गुन्ह्यांची नोद झाली होती. सन २०१९च्या तुलनेत सन २०२० मध्ये ५ लाख ३९ हजार ३ इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली असून २९ हजार ५७० इतके अधिकच्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. गुन्हे वाढीचे प्रमाण ५.४९% इतके मोठे आहे.
- ☞ सन २०२० मध्ये भारतात ६६ लाख १ हजार २८५ गुन्हे नोंदविले गेले असून महाराष्ट्रात ५ लाख ३९ हजार ३ (८.१७%) इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- ☞ सन २०२० मध्ये देशात ३० हजार १८३ खुनाचे गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी सर्वात जास्त उत्तर प्रदेश मध्ये ३ हजार ९३९ (१३.०५%) खुनाची प्रकरणे नोंदविली गेली आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात २ हजार २२९ (७.३८%) खूनाची प्रकरणे नोंदविली गेली असून दुसऱ्या क्रमांकावर आहे.
- ☞ सन २०२० मध्ये भारतात महिलांवरील अत्याचाराचे ३ लाख ७१ हजार ५०३ गन्ह्यांची नोंद झाली असून प्रथम क्रमांकावर उत्तर प्रदेशात ४९ हजार ३८५ (१३.२९%), दुसरया क्रमांकावर, राजस्थान ३४ हजार ५३५ तर महाराष्ट्रात ३१ हजार ९५४ गुन्ह्यांची नोंद झाली असून महिलांवरील अत्याचारात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे.
- ☞ सन २०२० मध्ये मुलांवरील अत्याचाराचे देशात १ लाख २८ हजार ५३१ गुन्हे नोंदविले गेले. त्यापैकी सर्वात जास्त मध्य प्रदेशात १७ हजार ८ (१३.२३%), त्यानंतर उत्तर प्रदेशात १५ हजार २७१ (११.८८%) तर महाराष्ट्रात १४ हजार ३७१ (११.१८%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- ☞ अनुसूचित जातीच्या व्यक्तींवर झालेल्या अत्याचाराचे देशात ५० हजार २९१ गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी महाराष्ट्रात २ हजार ५६९ (५.११%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

- ☞ अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे देशात ८ हजार २७२ गुन्हे नोंदविले गेले. त्यापैकी मध्यप्रदेशात २ हजार ४०१ (२९.०२%), राजस्थान १ हजार ८७८ (२२.७०%) तर महाराष्ट्रात ६६३(८.०१%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- ☞ भारतात ज्येष्ठ नागरिकांवर झालेल्या अत्याचाराचे २४ हजार ७९४ गुन्हे नोंदविले गेले त्यापैकी सर्वात जास्त ४ हजार ९०९ (१९.८०%) गुन्हे महाराष्ट्रात नोंदविले गेले आहेत.
- ☞ भारतात आर्थिक गुन्हेगारीची १ लाख ४५ हजार ७५४ प्रकरण नोंदविली गेली त्यापैकी सर्वात जास्त राजस्थान १८ हजार ५२८ (१२.७१%), उत्तर प्रदेश १६ हजार ७०८ (११.४६%), तेलंगणा १२ हजार ९८५ (८.९१%) तर महाराष्ट्रात १२ हजार ४५३ (८.५४%) प्रकरण नोंदविली गेली आहेत.
- ☞ भारतात भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे ३ हजार १०० इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी महाराष्ट्रात ६६४ (२१.४२%) गुन्हे नोंदविले गेले असून याबाबत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे.
- ☞ भारतात सायबर क्राईमचे ५० हजार ३५ गुन्ह्यांची नोंद झाली. त्यापैकी उत्तर प्रदेशात सर्वात जास्त ११ हजार ९७ (२२.१८%), त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर कर्नाटकात १० हजार ७४१ (२१.४७%), तर तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र असून ५ हजार ४९६ (१०.९८%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- ☞ राज्याविरोधात कारवाईची भारतात एकूण ५ हजार ६१३ गुन्हे नोंदविले गेले असून त्यापैकी प्रथम क्रमांकावर उत्तर प्रदेशात २ हजार २१७ (३९.५०%), दुसऱ्या क्रमांकावर तामिळनाडू ६६८ (११.९०%), तिसऱ्या क्रमांकावर आसाम ३३३ (५.९३%) तर चौथ्या क्रमांकावर महारष्ट्र असून २५२ (४.४९%) गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

(स्त्रोत: भारतातील गुन्हेगार, २०२०, राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण संस्था, गृह विभाग, भारत सरकार)

गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त
प्रत्यक्ष खर्च मात्र त्यापेक्षाही कमी

आलेख क्र. १ (रु. कोटीत)



	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३
अर्थसंकल्पीय अंदाज	१३३४१	१४६००	१५०९०	१७००७	१७९६८	२१७०६	२५२९६	२१४०५	२४५८७
सुधारित अंदाज	१३३३४	१५०३३	१७३११	१६५३९	१८४२९	२१८७८	२२४८७	१८८९१	
प्रत्यक्ष खर्च	११७३८	१३१११	१५९३५	१५०२०	१६३२१	१९९२१	१५४९४		

(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०२२-२३, सुधारित अंदाज २०२१-२२ व अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३)

- ☞ **वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या ७ वर्षांच्या कालावधीत एकाही वर्षात गृह विभागाला प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.**

- ☞ **वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज १५ हजार ९० कोटी रुपयांचे होते त्या तुलनेत १५ हजार ९३५ कोटी रुपये उपलब्ध झाले. म्हणजे ८४५ कोटी रुपये अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र त्यानंतर एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाजाइतका निधी उपलब्ध झालेला नाही.**

- ☞ **सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी १५ हजार ३६२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी १२ हजार २५६ कोटी रुपये खर्च करण्यात आले.**

- ☞ **सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षांच्या कालावधीत गृह विभागावर सन २०१९-२० या कालावधीत सर्वात जास्त रक्कम १९ हजार ९२१ कोटी रुपये खर्च झाले होते.**

- ☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३ हजार ३४१ कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. ११ हजार ७३८ कोटी (८८%) आहे.**

राज्य अर्थसंकल्पाच्या १०० रुपयाच्या तुलनेत गृह विभागाला मिळतात फक्त ५.४० रुपये

आलेख क्र. २



(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा) वर्ष २०२१-२२ सुधारित अंदाज व वर्ष २०२२-२३ अर्थसंकल्पीय अंदाज)

- ☞ वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या ७ वर्षाच्या कालावधीत गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.४० % एवढाच निधी उपलब्ध झाला.
- ☞ वर्ष २०१८-१९ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ४.९६ % दिसून येतो.
- ☞ वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ६.२०% इतके होते.
- ☞ वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत गृह विभागाच्या अर्थसंकल्पातील खर्चाचे प्रमाण ६.२० % इतका झाला होता. हे वर्ष वगळता, वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षाच्या कालावधीत राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५.५०% ही खर्च झालेला नाही.
- ☞ सन २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षात गृह विभागावर सरासरी १५ हजार ३६२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी पोलीस खात्यावर सरासरी १२ हजार २५६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. गृह विभागाच्या तुलनेत पोलीस खात्यावर झालेला खर्चाचे प्रमाण ७९.७८% आहे. म्हणजे उर्वरित खर्च म्हणजेच उर्वरित २०.२२ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.

पोलीस

> *“कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्याचा शोध घेणे आणि गुन्हे टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही पोलीसांची मुख्य कामे आहेत. शिवाय गुन्हे टाळणे, गुन्हेगारांवर खटले भरणे, कैद्यांना तसेच सरकारी तिजोरी, खाजगी तसेच सार्वजनिक मालमत्तेला संरक्षण देणे, वाहतूक सुव्यवस्था चालू ठेवणे, स्फोटक पदार्थांची तपासणी करणे, पूर्वचारित्र्य तपासून पाहणे ही महत्त्वाची कामेही पोलीस करतात, या व्यतिरिक्त सामाजिक, आर्थिक विविधता कार्यान्वयीत करण्यासाठीसुध्दा पोलीसांना कामगिरी बजावावी लागते. ”*
>
> – गृह विभाग, कार्यक्रम अंदाजपत्रक, २०२१-२२

पोलीस या मुख्य शीर्षावरील अंदाजीत व प्रत्यक्ष खर्च

आलेख क्र.३ (रु. कोटीत)



	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७	२०१७-१८	२०१८-१९	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३
अर्थसंकल्पीय अंदाज	१०४६९	११८५३	११५७९	१२७५३	१३८६६	१७२३३	२०२३०	२१५५८	२४६६३
सुधारित अंदाज	१०३४३	११६३२	१२४०४	१२५४५	१४००४	१७११६	१७५३७	१८९३३	
प्रत्यक्ष खर्च	८९१३	९९१६	११७३७	११३९९	१२३२१	१६१४७	१५३६१		

स्त्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश -लोकलेखा-मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०२१-२२ सुधारित अंदाज व २०२२-२३ अंदाजित खर्च

- ☞ वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी वर्ष २०१६-१७चा अपवाद वगळता शासनाने अर्थसंकल्पीय अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.
- ☞ वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु.११ हजार ५७९ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार १५८ कोटी इतका वाढून त्या वर्षातील खर्च रु. ११ हजार ७३७ कोटी इतका झाला आहे.
- ☞ वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या कालावधीमध्ये पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.
- ☞ वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये पोलीस खात्यावर सरासरी १२ हजार २५६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. गृह विभागाच्या तुलनेत पोलीस खात्यावर झालेला खर्चाचे प्रमाण ७९.७८% आहे. म्हणजे उर्वरित खर्च म्हणजेच उर्वरित २०.२२ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.

राज्याचा पोलिसांसाठी सरासरी उपलब्ध निधी फक्त ४.१२ %

आलेख क्र. ४



(स्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च)
वर्ष २०२१-२२चे सु. अंदाज व वर्ष २०२२-२३चे अर्थसंकल्पीय अंदाज)

☞ **वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ४.१२ % दिसून येते.**

☞ **वर्ष २०२०-२१ च्या मध्ये उपलब्ध झालेला निधी आतापर्यंतच्या नीचांकावर केवळ ३.८२ % आहे.**

राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्चातील फरक

तक्ता क्र.१ *(रु. कोटीत)*

वर्ष	गृह विभागावरील खर्च	पोलीस शीर्षावरील खर्च	टक्केवारी
२०१४-१५	११,७३८	८,९१३	७५.९३
२०१५-१६	१३,१११	९,९१६	७५.६३
२०१६-१७	१५,९३५	११,७३७	७३.६५
२०१७-१८	१५,०२१	११,३९९	७५.८८
२०१८-१९	१६,३२१	१२,३२१	७५.४९
२०१९-२०	१९,९२१	१६,१५१	८१.०८
२०२०-२१	२०,१३०	१५,३६१	७६.३१
२०२१-२२(सु. अं)	२६,८९७	१८,९३३	७०.३९
२०२२-२३(अ. अं)	३३,०३७	२४,६६३	७४.६५

स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च

☞ **वर्ष २०१४-१५ ते वर्ष २०२०-२१ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ७५.४९ % आहे म्हणजेच उर्वरित २४.५१ % खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.**

- ☞ वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१६-१७ पर्यंत पोलीस या शीर्षावर सरासरी रु.८ हजार ६९७ कोटी निधी उपलब्ध झाला.
- ☞ वर्ष २०१५-१६ शी तुलना करता वर्ष २०१६-१७ मध्ये गृह विभागाला उपलब्ध झालेल्या निधीत रु. १ हजार ८२१ कोटी वाढ झाल्याचे दिसते.

पोलिसांवरील वाढता ताण : महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १६९ पोलीस

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या अंदाजित १२ कोटी ४९ लाख एवढी असून २०२१ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ २ लाख ११ हजार १८३ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १६९ पोलीस आहेत. महाराष्ट्रात महिला पोलीसांची संख्या २७ हजार १६७ इतकी असून एकूण पोलीस संख्याबळाच्या तुलनेत ही संख्या १२.८६% इतकी आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होण्याची आवश्यकता आहे. - *स्रोत :माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २०२१*

महाराष्ट्र राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण नगण्य

राज्यात २ लाख ११ हजार १८३ पोलीस कार्यरत असून त्यापैकी महिलांची संख्या २७ हजार १६७ इतकी आहे. एकूण पोलिसांच्या प्रमाणात १२.८६% इतके कमी आहे. राज्यात महिलांची संख्या ६ कोटी २०लाख असून त्या प्रमाणात महिलांची भरती पोलीस विभागात होणे गरजेचे आहे.

- *स्रोत : पोलीस संशोधन व विकास विभाग (बीपीआरडी), भारत*

कारागृह-राज्यात १२ हजार ५९५ बंदी अतिरिक्त

कारागृहातील बंदी क्षमता २४ हजार ७२२ तर एकूण बंदी ३७ हजार ३१७

तक्ता क्र. २

कारागृहनिहाय अधिकृत बंदीक्षमता व प्रत्यक्ष बंदीसंख्या दि.२८/०२/२०२२

अ. क्र.	कारागृहाचे नांव	अधिकृत बंदीक्षमता			प्रत्यक्ष बंदीसंख्या			बंदीक्षमतेशी टक्केवारी
		पुरुष	स्त्री	एकूण	पुरुष	स्त्री	एकूण	
१	२	३	४	५	६	७	८	९
अ)	**मध्यवर्ती कारागृह**							
१	अमरावती म.का.	९३९	३४	९७३	११६८	३८	१२०६	१२४
२	नागपूर म.का.	१६९८	१४२	१८४०	२४१८	६८	२४८६	१३५
३	औरंगाबाद म.का.	११५३	६१	१२१४	११७१	५४	१२२५	१०१
४	नाशिकरोड म.का.	३११८	९०	३२०८	२६२६	६३	२६८९	८४
५	कोल्हापूर म.का.	१७५५	३४	१७८९	२०४४	४७	२०९१	११७
६	येरवडा म.का.	२३२३	१२६	२४४९	५८५१	२००	६०५१	२४७
७	मुंबई म.का	८०४	०	८०४	३५०४	०	३५०४	४३६
८	ठाणे म.का.	१०८०	२५	११०५	४४०३	१३५	४५३८	४११
९	तळोजा म.का.	२१२४	०	२१२४	२७६६	०	२७६६	१३०
	एकूण - (अ)	**१४९९४**	**५१२**	**१५५०६**	**२५९५१**	**६०५**	**२६५५६**	**१७१**
ब)	**जिल्हा कारागृह**							
१०	अकोला जि.का.	६७३	२२	६९५	३७८	१५	३९३	**५७**
११	भंडारा जि.का.	३३८	५	३४३	४०३	१२	४१५	**१२१**
१२	चंद्रपूर जि.का.	३२२	११	३३३	५७७	३७	६१४	**१८४**
१३	यवतमाळ जि.का.	२२४	५	२२९	४८५	०	४८५	**२१२**
१४	वर्धा जि.का.	२४३	९	२५२	४४०	२०	४६०	**१८३**
१५	धुळे जि.का.	२८५	९	२९४	३१४	५	३१९	**१०९**
१६	लातूर जि. का.	४८०	२०	५००	४१२	१३	४२५	**८५**
१७	भायखळा जि.का.	२००	०	२००	३७२	०	३७२	**१८६**
१८	कल्याण जि.का.	५०५	३५	५४०	१८९३	१३०	२०२३	**३७५**
१९	बुलढाणा जि.का.	९७	४	१०१	३२५	१४	३३९	**३३६**
२०	वाशिम जि.का.	१७०	३०	२००	२४६	६	२५२	**१२६**
२१	बीड जि.का.	१४४	१७	१६१	२६१	५	२६६	**१६५**
२२	जालना जि.का.	५२६	३०	५५६	२३९	१०	२४९	**४५**
२३	जळगांव जि.का.	१८६	१४	२००	३९६	२५	४२१	**२११**
२४	नांदेड जि.का.	१४५	१५	१६०	४८८	३४	५२२	**३२६**
२५	नंदुरबार जि.का.	४५०	५०	५००	१७८	१२	१९०	**३८**
२६	परभणी जि.का.	२४०	१२	२५२	३८२	१७	३९९	**१५८**
२७	उस्मानाबाद जि.का.	२४२	२७	२६९	२७२	१४	२८६	**१०६**
२८	अहमदनगर जि.का.	६३	६	६९	१८६	०	१८६	**२७०**
२९	सांगली जि.का.	२०५	३०	२३५	२५१	११	२६२	**१११**
३०	सातारा जि.का.	१५९	९	१६८	३७७	१९	३९६	**२३६**
३१	सोलापूर जि.का.	१२७	१४	१४१	४१०	३९	४४९	**३१८**
३२	अलिबाग जि.का.	८०	२	८२	१६४	१३	१७७	**२१६**

तक्ता क्र. ३

कारागृहनिहाय अधिकृत बंदीक्षमता व प्रत्यक्ष बंदीसंख्या दि.२८/०२/२०२२								
अ. क्र.	कारागृहाचे नांव	अधिकृत बंदीक्षमता			प्रत्यक्ष बंदीसंख्या			बंदीक्षमतेशी टक्केवारी
		पुरुष	स्त्री	एकुण	पुरुष	स्त्री	एकुण	
१	२	३	४	५	६	७	८	९
३३	सावंतवाडी जि.का.	५६	२२	७८	५०	२	५२	**६७**
३४	सिंधुदुर्ग जि.का.	१७६	२४	२००	१९	०	१९	**१०**
३५	भुसावळ जि.का.	६०	०	६०	५६	०	५६	**९३**
३६	कोल्हापूर जि.का.(शहर)	१०४	२१	१२५	१०८	४	११२	**९०**
३७	जे.जे. रुग्णालय का.	२०	०	२०	१	०	१	**५**
	एकूण-ब	**६५२०**	**४४३**	**६९६३**	**९६८३**	**४५७**	**१०१४०**	**१४६**
क)	**विशेष कारागृह**							
३८	रत्नागिरी विशेष.का	**२४३**	**३**	**२४६**	**१५८**	**४**	**१६२**	**६६**
ड)	**महिला कारागृह**							
३९	मुंबई महिला जि.का.	**०**	**२६२**	**२६२**	**०**	**३२९**	**३२९**	**१२६**
इ)	**किशोर सुधारालय**							
४०	किशोर सु.नाशिक	**१०५**	**०**	**१०५**	**८**	**०**	**८**	**८**
फ)	**खुले कारागृह**							
४१	मोर्शी खुले कारागृह	२००	०	२००	८	०	८	**४**
४२	गडचिरोली खुले कारागृह	७५	०	७५	१३	०	१३	**१७**
४३	पैठण खुले कारागृह	५००	०	५००	२१	०	२१	**४**
४४	येरवडा खुले कारागृह	१७२	०	१७२	२९	०	२९	**१७**
४५	औरंगाबाद खुले कारागृह	५०	०	५०	०	०	०	**०**
४६	विसापूर खुले कारागृह	२००	०	२००	१५	०	१५	**८**
४७	अमरावती खुले कारागृह	५०	०	५०	६	०	६	**१२**
४८	नागपूर खुले कारागृह	५०	०	५०	७	०	७	**१४**
४९	अकोला महिला खु.का.	०	५०	५०	०	२	२	**४**
५०	नाशिकरोड खुले कारागृह	५०	०	५०	०	०	०	**०**
५१	कोल्हापूर खुले कारागृह	५०	०	५०	१२	०	१२	**२४**
५२	येरवडा महिला खुले का.	०	५०	५०	०	५	५	**१०**
५३	ठाणे खुले कारागृह	२५	०	२५	२	०	२	**८**
५४	यवतमाळ खु.का.	१५	०	१५	०	०	०	**०**
५५	वर्धा खुले कारागृह	१५	०	१५	०	०	०	**०**
५६	धुळे खुले कारागृह	१५	०	१५	०	०	०	**०**
५७	लातूर खुले कारागृह	१५	०	१५	०	०	०	**०**
५८	रत्नागिरी खुले कारागृह	१५	०	१५	०	०	०	**०**
५९	सिंधुदुर्ग खुले कारागृह	१५	०	१५	०	०	०	**०**
	एकूण फ	**१५१२**	**१००**	**१६१२**	**११३**	**७**	**१२०**	**७**
ग)	**इतर कारागृह**							
६०	स्वतंत्रपूर खु.व.,आटपाडी	**२८**	**०**	**२८**	२	०	२	**७**
	एकूण(अ ते ग)	**२३४०२**	**१३२०**	**२४७२२**	**३५९१५**	**१४०२**	**३७३१७**	**१५१**

(स्त्रोत : कारागृह सांख्यिकी)

☞ दि. २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह-१ जिल्हा कारागृह-२ व जिल्हा कारागृह-३ यांची एकत्रित बंदी क्षमता २३ हजार ९४२ इतकी होती. त्यामध्ये ३७ हजार ३१७ बंदी ठेवण्यात आले होते. म्हणजे उपलब्ध क्षमतेपेक्षा १५० % म्हणजे १२ हजार ५९५ अधिकचे बंदी कारागृहात ठेवण्यात आले होते. हे एकाप्रकारे मानवी हक्कांचा भंगच म्हणावा लागेल.

मध्यवर्ती कारागृहात १५ हजार ५००ची बंदी क्षमता असताना २६ हजार ५५६ बंदी ठेवण्यात आले होते. म्हणजे ११ हजार ५६ कैदी अतिरिक्त होते. तर जिल्हा कारागृह व इतर कारागृहांमध्ये ९ हजार २२२ कैदी क्षमता असताना १० हजार ७६१ कैदी ठेवण्यात आले होते. याचा अर्थ या कारागृहांमध्ये १ हजार ५३९ कैदी अतिरिक्त होते.

अतिरिक्त तुरुंग उभारा - उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला आदेश

मुंबई व पुण्यासह राज्यभरातील तुरुंगामध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने आणि तुरुंगाची स्थिती समाधानकारक नसल्याने त्याविषयी चिंता व्यक्त करतानाच मुंबई व पुण्यात अतिरिक्त तुरुंगांची उभारणी करण्याकरिता राज्य सरकारने तीन महिन्यांच्या आत योग्य ती पावले उचलावीत, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला.

कैद्यांना सुविधा पुरवा!

मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

राज्यभरातील तुरुंगात असलेल्या हजारो कैद्यांच्या आरोग्याबाबत जिल्हावार आहार तज्ज्ञांनी पूर्वसूचना न देता आकस्मिक करावयाची आहे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही.